अपिल प्राधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त
शिवाजीनगर-घोलेरोड क्षेकार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. ९००/४०९५
दिनांक : २६/०८/२०१९

अपिल प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
अपिल क्र. अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय,
शिवाजीनगर-घोलेरोड क्षे.कार्यालय/पुणे मनपा/अपिल/८२१ दिनांक ०२/०५/२०१९

१) अपिलकर्ता श्री किशोर दामू अडागळे
रा – गल्ली क्र. ७, पाटील इस्टेट,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

२) जनमाहिती अधिकारी तथा
उप अभियंता
शिवाजीनगर-घोलेरोड क्षे.कार्यालय,
पुणे महानगरपालिका

श्री किशोर दामू अडागळे अपिलार्थी
विरुध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, शिवाजीनगर-घोलेरोड, पुणे मनपा.

माहितीचा अधिकार २००५ चे कलम १९(१) अन्वये सुनावणी दि. २०/०६/२०१९

अपिलकर्ता श्री किशोर दामू अडागळे यांचा दिनांक २०/११/२०१८ रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज प्राप्त झाला आहे. अपिलकर्ता श्री किशोर दामू अडागळे यांनी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, यांचेकडे पुणे शहरातील नरवीर तानाजी वाडी येथील साखर संकुल येथील गेट बाहेरील फुटपाथ वरील चाललेल्या शौचालय/मुतारी बांधकामाबाबत माहिती मिळणेसाठी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे अर्जान्वये अर्ज सादर केला आहे.

जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, पुणे मनपा यांनी अपिलकर्ता यांस खात्याकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात येईल असे कळविले आहे.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिका-याने उपलब्ध करुन दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधिची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| २०/११/२०१८ | १९/१२/२०१८ | निरंक | निरंक | |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण पुढीलप्रमाणे :- माहिती अधिकार अर्जात नमूद केलेली कागदपत्रे अथवा कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नसल्याने सदरचे अपिल दाखल करण्यात आले असे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| ०२/०२/२०१९ | ०२/०५/२०१९ | नाही | निरंक | जा.क्र. ६०९ दि.१०/०५/२०१९<br>जा.क्र. ९३४ दि.२३/०५/२०१९<br>जा.क्र. १४०० दि.०६/०६/२०१९ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. २०/०६/२०१९ वेळ सकाळी ११.१५ वाजता

सुनावणीस अपिलकर्ता :- अनुपस्थित

सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिलेल्या माहितीचा तपशिल खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिका-याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | पुणे शहरातील नरवीर तानाजी वाडी येथील साखर संकुल येथील गेट बाहेरील फुटपाथ वरील चाललेल्या शौचालय/मुतारी बांधकामाबाबत माहिती मिळणेबाबत. | जनमाहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यास खात्याकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात येईल |

सदरची माहिती अपिलकर्ता यांस उपलब्ध झाली नसल्याने पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## -आदेश-

दि.२०/०६/२०१९ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांस आवश्यक ती माहिती उपलब्ध करून देण्याचे आदेश देण्यात आले होते.

त्यानुसार उप अभियंता तथा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांस तोंडी व पत्राद्वारे तसेच दि.२४/०७/२०१९ व दि.२९/०७/२०१९ रोजी अपिलार्थी यांना माहिती घेऊन जाण्यास सांगितले असता त्यांनी माहिती घेऊन जाणेचे टाळले आहे.

त्यामुळे अपिलार्थी श्री किशोर दामू अडागळे यांचा अपिल अर्ज निकालात काढण्यात येत आहे.

टिप :- १) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसांच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नविन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे ४११००१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

27/8/19

(किशोरी शिंदे)
अपिल प्राधिकारी *तथा*
महापालिका सहाय्यक आयुक्त
शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका